महाराष्ट्र शासन

# अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.

आदिवासी विकास भवन, तळ मजला, गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.

दूरध्वनी क्र. ०२५३-२५७५८१६ E_mail : atc.nsk-mh@gov.in

## जाहिरात

महाराष्ट्र शासन राजपत्र क्र- RBTC/13013(4)/Notification-1/474/2014, Dated 9.06.2014 रोजी अधिसूचना प्रसिद्ध करुन विविध विभागातील सुमारे १७ संवर्गाची पदे स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरण्याचा निर्णय घेतलेला आहे. आदिवासी विकास विभागांतर्गत अनुसूचित क्षेत्रातील गट-क संवर्गातील शिक्षक संवर्गाची पदे स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरावयाचे निर्देश प्राप्त आहेत.

सदर पदे भरण्यासाठी **आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-आस्था-२०१६/प्र.क्र.३८७/का.१५, दिनांक १ डिसेंबर, २०१८** मधील तरतुदीनुसार विशेष भरती प्रक्रिया राबवून १०० टक्के शिक्षक संवर्गाची भरती करणे बाबत निर्देशीत आहे.

रोजंदारी/तासिका तत्वारील कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपिठ औरंगाबाद यांचे कडे दाखल रिट याचिका क्रमांक WP/५८६७/२०१५ व इतर च्या अनुषंगाने दिनांक ३१.१०.२०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णया बाबत मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे दाखल अपील प्रकरणाच्या निर्णयाच्या अधिन राहून अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक अंतर्गत दि. ३१ ऑक्टोबर, २०१८ अखेरची अनुसूचित क्षेत्रातील उच्च माध्यमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक व प्राथमिक शिक्षक या तीन संवर्गाची रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता सदरची जाहिरात प्रसिद्ध करण्यात येत आहे.

शिक्षक पद भरतीचे निकष **आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-आस्था/२०१६/प्र.क्र.३८७/का.१५ दिनांक १ डिसेंबर, २०१८** अन्वये बदलले असल्याने दिनांक २०.०१.२०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली शिक्षक संवर्गाची जाहिरात रद्द करण्यात आली आहे याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**मिनीस्ट्री ऑफ लॉ अँण्ड जस्टीस, लेजिस्लेटीव्ह डिपार्टमेंट, नोटीफीकेशन, नवी दिल्ली यांनी दिनांक २.१२.१९८५** रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेतील नमूद असलेल्या अनुसूचित क्षेत्रातील गावांच्या यादीमध्ये मा. राज्यपाल महोदयांच्या ९ जून २०१४ च्या अधिसूचनेतील अटी शर्तीची पुर्तता करीत असलेल्या नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगांव, अहमदनगर या जिल्हातील अनुसूचित क्षेत्रातील अनुसूचित जमाती या प्रवर्गातील स्थानिक उमेदवारांकडून खालील तपशिला प्रमाणे शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षक संवर्गाचे पदे भरण्याकरिता पात्रता धारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदाचे नाव | | जिल्हा | पदांची संख्या | एकुण पदे |
|---|---|---|---|---|
| १) प्राथमिक शिक्षक | मराठी माध्यम | नाशिक | ८५ | ८५ |
| | | नंदूरबार | १८४ | १८४ |
| | | धुळे | २६ | २६ |
| | | जळगाव | १२ | १२ |
| | | अहमदनगर | ० | ० |
| | | **एकुण** | ३०७ | ३०७ |
| २) प्राथमिक शिक्षक | इंग्रजी माध्यम | नाशिक | ० | ० |
| | | नंदूरबार | ०६ | ०६ |
| | | धुळे | ० | ० |
| | | जळगाव | ० | ० |
| | | अहमदनगर | ० | ० |
| | | **एकुण** | ०६ | ०६ |

| ३) माध्यमिक शिक्षक (मराठी माध्यम) | जिल्हा | विषयनिहाय पदसंख्या तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जनरल | इंग्रजी | गणित | विज्ञान | एकूण |
| | नाशिक | ३४ | १४ | १२ | १० | ७० |
| | नंदूरबार | २८ | १४ | २१ | २१ | ८४ |
| | धुळे | ६ | १ | ३ | ३ | १३ |
| | जळगाव | १ | ० | ० | ० | १ |
| | अहमदनगर | ६ | १ | १ | १ | ९ |
| एकुण पदे | | ७५ | ३० | ३७ | ३५ | १७७ |

| ४) माध्यमिक शिक्षक (इंग्रजी माध्यम) | जिल्हा | विषयनिहाय पदसंख्या तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | जनरल | इंग्रजी | गणित | विज्ञान | एकूण पदे |
| | नाशिक | ० | ० | ० | ० | ० |
| | नंदूरबार | २ | २ | १ | १ | ६ |
| | धुळे | ० | ० | ० | ० | ० |
| | जळगाव | ० | ० | ० | ० | ० |
| | अहमदनगर | १ | १ | १ | ० | ३ |
| एकुण पदे | | ३ | ३ | २ | १ | ९ |

| ५) कनिष्ट महाविद्यालय शिक्षक | जिल्हा | विषयनिहाय पदसंख्या तपशिल | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अर्थशास्त्र | इंग्रजी | इतिहास/भुगोल/ राज्यशास्त्र/समाजशास्त्र | जिवशास्त्र/ प्राणीशास्त्र | रसायन/भौतिक शास्त्र | मराठी | गणित | एकूण पदे |
| | नाशिक | ६ | ७ | ७ | ५ | १६ | ६ | ४ | ५१ |
| | नंदूरबार | ४ | ५ | १० | ३ | १० | ४ | १ | ३७ |
| | धुळे | १ | ० | ३ | १ | २ | ३ | १ | ११ |
| | जळगाव | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ |
| | अहमदनगर | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | ७ |
| एकुण पदे | | १२ | १३ | २१ | १० | ३० | १४ | ७ | १०७ |

टिप :- १) वर नमूद केलेल्या पदसंख्येत बदल होऊ शकतो.

**अर्ज करण्याची पद्धत व अत्यावश्यक सूचना**

| | |
|---|---|
| १. | जाहिरात व पद भरती संबंधीच्या बाबत https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर सविस्तर सूचना उपलब्ध असून, दिनांक १२ डिसेंबर, २०१८ ते दिनांक ६ जानेवारी, २०१९ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत पात्रता धारक उमेदवारांनी वर नमूद संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीनेच अर्ज करावेत. |
| २. | अपर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक या कार्यालयास वरील संकेतस्थळ व वर नमूद कालावधी व्यतिरिक्त इतर पद्धतीने आलेल्या, या जाहितीपूर्वी प्राप्त झालेल्या कोणत्याही अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. |
| ३. | सदर जाहिरात ही केवळ **नाशिक, नंदूरबार, धुळे जळगांव व अहमदनगर** या जिल्ह्यांमधील **अनुसूचित क्षेत्रात (पेसा क्षेत्रात) कायम निवासी असलेल्या केवळ अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गाकरीताच आहे** याची सर्वांनी नोंद घ्यावी. |

**मा. अपर आयुक्त महोदयांची स्थळ प्रतिवर स्वाक्षरी असे.**

सही/-

(प्रदिप भा. पोळ)

उप आयुक्त,